मराठी भाषिक मंडळ एडमंटन

# अनुबंध

शनिवार, 21 मार्च 2015




***॥ नव्या बांधूया रेशीमगाठी, जपण्या अपुली मायमराठी ॥***

चैत्राची सुरवात ज्या दिवसाने होते तो दिवस म्हणजे गुढीपाडवा. चैत्र शुक्ल पक्षाच्या प्रथम दिवशी (पाडव्याला) प्रभू राम सपत्नीक आपल्या सर्व दलासमवेत अयोध्येला 14 वर्षांचा वनवास संपवून परत आले होते. त्या रावणावरच्या अतुलनीय विजयाचे कौतुक म्हणून राम आपल्या घरी परत आल्यामुळे आनंदीत झालेल्या नगर जनांनी, आपल्या आनंदाच्या प्रित्यर्थ गुढ्या उभ्या केल्या. तो दिवस म्हणजे गुढीपाडवा. या दिवशी सगळ्यांना मराठी मंडळातर्फे अनेक शुभेछा !!

-----***------

कोणतही एक क्षेत्र घ्या मराठी भाषेनं आपल्याला काय दिलं नाही . अगदी संत परंपरा , साहित्य, विचारवंत , समाजसुधारक , राजकारणी , क्रांतिकारी , पासून ते आजचे शास्त्र ज्ञ , कलावंत , गायक , चित्रपट पर्यंत सगळ्या क्षेत्रात पोचलेल्या श्रेष्ठ व्यक्ती दिल्या . मनात आणला तर मराठी माणूस सुद्धा काहीही करू शकतो. आपण आपला देश, आपली माणसा सोडून एवढ्या लांब आलो. या सगळ्या मिश्र संस्कृतीत मिळून मिसळून राहत असताना आपला मराठीपणा पणा आपण टिकवून आहोत ही अतिशय कौतुकाची आणि आपल्याला अभिमान वाटावा अशी गोष्ट आहे. आपल्या सर्वांमध्ये आपली मराठी भाषा हा एक आपल्याला एकत्र धरून ठेवणारा महत्वाचा धागा आहे. त्याची जोपासना करण्या करता आज एक नवीन उपक्रमाची आम्ही सुरुवात करत आहोत.

**॥ नव्या बांधूया रेशीमगाठी, जपण्या अपुली मायमराठी ॥**

**भाषे मुळे आपल्याला एकत्र आणणारे आपले सर्वांचे मराठी वृत्तपत्र (E-Newsletter) – "अनुबंध"**

ऋजुता मुधोळकर



# अनुबंध

यात आपल्या मंडळाची आणि कार्यक्रमांची माहिती असेलच . शिवाय एडमंटन मराठी विश्वातल्या महत्वाच्या घडा-मोडी, विचार, तुमच्या गोष्टी , कविता , सूचना ,बातम्या , विशेष फोटो , जाहिराती , Announcements, या सर्वांचा समावेश केला जाई

MBME members can add services they would like to provide - Services include activities like teaching Marathi, Marathi Story Telling, Reading, Marathi Library. Interested members please contact by email mbmenewsletter@gmail.com

तुमचे लेख, विचार किंवा सूचना 31 मार्च पर्यंत आम्हाला इमेल करा mbmenewsletter@gmail.com

------***------

**पुढील कार्यक्रम-**

महाराष्ट्र दिन 2015 - 9 मे, 2015 रोजी साजरा करणार आहोत. नकला , नाटक, नृत्य , गायन अशा रंगारंग कार्यक्रमाची साविस्तर माहिती एमेल ने लवकरच कळवण्यात येइल.

------***------

**MBME Executive Committee Members :**

**President** : Anupama Deshpande
**Vice President**: Shailesh Arora
**Secretary**: Anagha Deshpande
**Treasurer** : Sanjay Deshpande
**Member at Large**: Amol Sagare
**Member at Large** : Vijay Datar

MBME annual membership 2015 fees in cash or by cheque payable to "MBME"
Family – $160.00
Couple (or with child up to 2 years of age) – $120.00
Single – $80.00 / Student – $50.00




***- Facts of Edmonton -***

भारतीय भाषीय लोकसंख्या

मराठी - 275 - सर्वात कमी भाषीय लोकसंख्या

पंजाबी -18505 - सगळ्यात जास्त लोकसंख्या

World cup जिंकण्यासाठी 11 जणांची टीम पुरेशी आहे. आपण तर 275 आहोत !!

